**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५/२०१६-१७/१३८ दिनांक: २३-०९-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. १५/२०१६-२०१७**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. विलास कोंडीबा सुर्यवंशी<br>मु. पो. कोसारी<br>ता. जत, जिल्हा. सांगली | : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ | | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग जत | | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

१) तक्रारदार यांनी त्यांच्या मौजे कोसारी ता. जत. जि. सांगली येथील गट क्र.५१६ मध्ये नवीन कृषि पंपासाठी विद्युत पुरवठा मिळणेबद्दल अर्ज करुन त्याबद्दल दि. ०६-०४-२०१५ रोजी रु.६१००/- वि.प. यांचे कार्यालयात जमा केले. तथापि, तक्रारदार यांना तीन महिन्यात वीज जोडणी मिळाली नाही. त्यामुळे दिनाक ३०-०४-२०१६ रोजी तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार दाखल केली. तथापि सदर कक्षाने दि. २८-०६-२०१६ चे आदेशाने, जेष्ठता यादीनुसार तक्रारदार यांना वीज जोडणी देणेत येईल असे तक्रारदार यांना कळविले. त्या निर्णयावर नाराज होऊन सदरचे अपिल तक्रारदार यांनी दि. २७-०७-२०१६ रोजी या मंचाकडे दाखल केले आहे.

२) वि.प. यांचेतर्फे दि. २२-०९-२०१६ रोजी म्हणणे विलंबाने लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, तक्रारदार यांना वीज जोडणी देणेसाठी दोन पोलची वीज वाहिनी आवश्यक आहे. त्याचा प्रतिक्षा यादीतील क्रमांक ६९६ असा आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ च्या परिच्छेद ४.४ नुसार प्रथम आलेल्यास प्रथम विद्युत पुरवठा करणेत येतो. अन्य ग्राहक केस क्र.१ आणि ५/१४-१५ यामध्ये या मंचाने तशा प्रकारचा आदेशही दिनाक ३०-०५-२०१४ रोजी केला होता. (त्यांची छायांकित प्रत दाखल केली आहे.)त्याचप्रमाणे या प्रकरणात आदेश व्हावेत अशी विनंती करणेत आली आहे.

३) प्रस्तुत प्रकरणाची या मंचासमोर दि. २२-०९-२०१६ रोजी सुनावणी घेणेत आली. तक्रारदारतर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री हरीभाऊ खापरे यांनी तर वि.पं.तर्फे कार्यकारी अभियंता श्री दराडे व श्री मैलापूरे यांनी तोंडी म्हणणे मांडले. या मंचाने दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले आहे.

४) या मंचाने निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

(१) तक्रारदार यांचे मागणी प्रमाणे त्यांना लौकर विद्युत पुरवठा करणेचा आदेश देणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

(२) कोणता आदेश?

उत्तर :- अंतिम आदेशाप्रमाणे.

## <u>कारणमिमांसा</u>

५) या प्रकरणात असे दिसून येते की, विद्युत वाहिनीचा विस्तार करुन वीज पुरवठा करता येवू शकेल. कृति मानकानुसार तीन महिन्यामध्ये वीज जोडणी देणे आवश्यक होते. तसे न केल्यास विलंबापोटी भरपाई देणेची जबाबदारी वि.प. यांचेवर येते. याबाबत ऊभय पक्षात वाद नाही. श्री हरिभाऊ खापरे यांनी कोणतीही भरपाई तक्रारदार मागत नाहीत असे स्पष्टपणे मंचासमोर तोंडी निवेदन दिले आहे.

६) विनियम २००५ मधील परिच्छेद ४.४ नुसार वितरण कंपनी प्रत्येक टेरिफ कॅटेगरीमध्ये विद्युत पुरवठा शक्यतो प्रथम येणा-यास प्रथम सेवा या तत्वाच्या आधारे देईल ही गोष्ट खरी आहे. तथापि त्यातील परंतुका प्रमाणे, पुरवठयासाठी लागू केलेल्या विशिष्ट मुदतीचे बंधन वि.प. यांचेवर बंधनकारक आहे.त्यामुळे तक्रारदार यांना निर्देशित मुदतीमध्ये वीज जोडणी देणे कोणलाही टाळता येण्यासारखे नाही. आदेश केस क्र.१ आणि ५/२०१४-१५ मधील या मंचाचा पूर्वीचा निर्णय या मंचावर बंधनकारक रहात नाही.

७) जर वितरण कंपनीस कृति मानकाप्रमाणे ठराविक मुदतीत कार्यवाही करणेस अडचणी येत असतील तर अशा विनियमातील अडचणी दूर करण्याचे अधिकार मा. विद्युत नियामक आयोगास आहेत. त्यामुळे या प्रकरणात वितरण कंपनीस असलेल्या अडचणी योग्य वाटत असूनही तक्रारदार यांना विहीत मुदतीत वीज जोडणी देणेचा आदेश करण्यावाचून अन्य मार्ग उपलब्ध नाही.

वरील सर्व कारणांस्तव खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

**आदेश**

१) वि.प. यांनी तक्रारदार यांना त्यांनी मागणी केलेप्रमाणे वीज जोडणी माहे डिसेंबर २०१६ पर्यन्त नियमानुसार द्यावी.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (वि. श. गुळवणी) | (प्र.वि. खपली) | (श्री प्र एस. बुरांडे) |
| अध्यक्ष | सदस्य सचिव | ग्राहक सदस्य |